# Mumbai University 55th Youth Festival 2022

SSPM's college of engineering student Mr.Ankur Soni won prize in Mumbai university 55th youth festival " Marathi elocution " event.

## मुंबई विद्यापीठाच्या युवा महोत्सवात एसएसपीएम अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या अंकुर सोवनीचे यश





मुंबई विद्यापीठाच्या ५५ व्या युवा महोत्सवाच्या अंतिम फेरीमध्ये सिंधुदुर्ग शिक्षण प्रसारक मंडळाचे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या अंकुर सोवनीने घवघवीत यश संपादन केले.

**कणकवली(प्रतिनिधी)**

मुंबई विद्यापीठाच्या सन २०२२ च्या ५५ व्या युवा महोत्सवात वक्तृत्व स्पर्धेत अंतिम फेरीमध्ये सिंधुदुर्ग शिक्षण प्रसारक मंडळाचे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या अंकुर सोवनीने विजेतेपद पटकावले.

सिंधुदुर्ग शिक्षण प्रसारक मंडळाचे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रा. कल्पेश कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली १२ सप्टेंबर २०२२ रोजी मुंबई विद्यापीठात संपन्न झालेल्या ५५ व्या युवा महोत्सवाच्या अंतिम फेरीमध्ये महाविद्यालयाच्या मेकॅनिकल विभागाचा विद्यार्थी कु. अंकुर सोवनी याने मराठी वक्तृत्व स्पर्धा या प्रकारात सहभाग घेतला. यात मुंबई विद्यापीठांतर्गत महाविद्यालयांमधुन ३८ विद्यार्थी सहभागी झाले होते. पैकी अंकुर सोवनी हा सिंधुदुर्ग जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणारा एकमेव विद्यार्थी होता.

या करीता स्टुडंट कोऑर्डीनेटर म्हणून चैतन्य आरेकर, योगीता लोके व तन्वी पाडावे यांनी काम पाहीले. कुमार अंकुर सोवनी याचे संस्थेच्या अध्यक्षा सौ. निलमताई राणे, उपाध्यक्ष निलेश राणे, सचिव नितेश राणे, प्राचार्य डॉ. अनिश गांगल, शासकीय अधिकारी शांतेश रावराणे, सर्व विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.


मुंबई विद्यापीठ
Lifelong Learning &


मुंबई विद्यापीठ
विद्यापीठ विद्यार्थी भवन
'बी' पथ, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०
University of Mumbai
University of Mumbai
Vidyapeeth Vidyarthi Bhavan
`B' Road, Churchgate, Mumbai - 400 020